# अपहृत बालकाची सहा तासात सुटका; तिघांना अटक

**नाशिक :** सिन्नर शहरातून अपहरण झालेल्या १२ वर्षीय बालकास संशयितांनी सहा तासांनंतर मध्यरात्रीच्या सुमारास पुन्हा घराजवळच्या परिसरात सोडून दिले. अपहृत बालक सुखरूप असून, या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. संबंधित बालकाचे वडील सिन्नरमधील मोठे व्यापारी असून, त्यांच्या मुलाचे अपहरण केल्यास पाच-दहा लाख रुपये मिळतील, या विचारातून संशयितांनी हे कृत्य केल्याचे तपासात उघड झाले आहे.

रोशन नंदू चव्हाण व यश संदीप मोरे अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे असून, आकाश भास्कर दराडे हा त्यांचा साथीदार संगमनेर येथे पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. सिन्नर शहरातील काळेवाडा भागात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास चिराग कलंत्री आपल्या घराजवळ मित्रांसमवेत खेळत असताना, विनानंबरच्या पांढऱ्या रंगाच्या मारुती ओम्नी वाहनातून आलेल्या संशयितांनी त्याचे अपहरण केले. मित्रांनी ही बाब त्याच्या कुटुंबीयांना सांगितल्याने हा प्रकार समोर आला. चिरागचे वडील तुषार कलंत्री व नातेवाइकांनी तत्काळ पोलीस ठाण्यात धाव घेतली. चिराग हा सिन्नर बाजारातील आडत व्यापारी सुरेश कलंत्री यांचा नातू असून, इयत्ता पाचवीत शिकत आहे. बालकाच्या अपहरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर जिल्हा अधीक्षक माधुरी कांगणे सिन्नरला दाखल झाल्या. पोलिसांनी तातडीने शोध मोहीम सुरू केली. परिसरातील सीसीटीव्हीच्या आधारे संशयितांच्या वाहनाचा माग काढण्याचे प्रयत्न झाले. नाशिकसह पुणे ग्रामीण, पिंपरी चिंचवड, पुणे शहर, नगर पोलिसांना माहिती देऊन ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. तसेच, सोशल मीडियावर अपहृत बालकाचे छायाचित्र व मारुती ओम्नीची माहिती प्रसारित करून ती कुठे दिसल्यास संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले. त्यामुळे घाबरून संशयितांनी मध्यरात्री १ वाजता चिरागला मोटरसायकलवर आणून घराच्या परिसरात सोडून दिले. या अपहरण नाट्यासाठी संशयितांनी ३४ हजार रुपयांत मारुती ओम्नी कार खरेदी केली होती.

पोलीस पथके संशयितांच्या मागावर होती. या संदर्भात मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी रोशन चव्हाण आणि यश मोरे यांना ताब्यात घेतले असता, या घटनेचा उलगडा झाला. पोलिस तपासात आकाश दराडे या साथीदाराच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली संशयितांनी दिल्याने पोलिसांनी संगमनेर शहरात त्याच्या मुसक्या आवळल्या. या गुन्ह्यात सहभागी असलेल्या अन्य संशयितांच्या शोधार्थ पथके रवाना करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी पत्रकार परिषदेत दिली. या गुन्ह्यात उत्कृष्ट कामगिरीबद्दल उमाप यांनी तपास पथकाला १५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

# शाळकरी मुलीचा पाठलाग करणाऱ्याला अटक

**पुणे :** शाळकरी मुलीचा पाठलाग करणाऱ्या शादाब युसुफ मुल्लाला गुरुवारी अटक करण्यात आली. यासंदर्भात शाळकरी मुलीच्या आईने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही मुलगी सिंहगड रस्ता भागातील एका शाळेत आहे. शादाब मुल्ला शाळकरी मुलीचा पाठलाग करून तिला त्रास द्यायचा. मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी मुल्ला याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार,**
**जि. पालघर - ४०१ ६०३.**
Web. http://mahatenders.gov.in
Email. jawhar.ee@mahapwd.com
**ई-निविदा सूचना क्रमांक- ३७, सन २०२२-२३.**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जिल्हा पालघर. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ई-निविदे मधील सर्व अटी शर्तींची पूर्तता करणाऱ्या **योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून** खालील कामांकरीता **'बी-१'** नमुन्यातील ई-निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली ई-निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची मूळ किंमत रु. लक्ष | इसारा रक्कम रुपये | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विक्रमगड तालुक्यातील देहर्जे हातणे (रिवेरा हॉस्पिटल) कुर्झे रस्ता ग्रा.मा. कि.मी. ०/०० ७/०० मध्ये रस्त्याचे बांधकाम करणे. ता. विक्रमगड, जि. पालघर. | भाग-अ (स्थापत्य कामांची किंमत) १,६२,५५,६६०/- भाग-ब (Royalty Charges) २,२६,१६१/- भाग-क (Testing Charges) १,०८,७९०/- एकूण- १,६५,९०,६११/- | १,५०,०००/- | अनिवार्य नाही | रु.१०००/-+ १८% जीएसटी रु. १८० एकूण - ११८०/- | ३०० दिवस (पावसाळा धरून) | |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** — **दिनांक- १०/०१/२०२३ ते दिनांक- २४/०१/२०२३ पर्यंत.**
**ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** — **दिनांक- २६/०१/२०२३ (११.०० वा. शक्य झाल्यास)**
**निविदा-पूर्व बैठक** — **दिनांक- १८/०१/२०२३ मा. मुख्य अभियंता, सा. बां. मंडळ, ठाणे यांचे कार्यालयात दुपारी १२.०० वाजता.**

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**टिप :-**
१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in
२ निविदाकारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व DSC डिजीटल प्रमाणपत्र वितरीत व Portal वर Enrollment करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. Toll Free No.: 180030702232, E-Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in
३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा / बयाणा रक्कम, ई-निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्तऐवजाच्या मूळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.
४. सादर केलेल्या निविदा कागदपत्रांची प्रत स्वतंत्र पाकिटात **दिनांक-२६/०१/२०२३** रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.
५. शासन निर्णयानुसार निम्नतम निविदाकाराचा (L-1) कमी दराबाबतचा (Performance Security) चा FDR/B.G लिफाफा क्र. २ (Financial Bid) उघडल्याच्या दिनांकापासून **८ (आठ)** दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नतम निविदाकाराची (L-1) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व द्वितीय निम्नतम निविदाकारास (L-2) ला काम देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
६. इतर अटी व शर्ती ई-निविदेमध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
७. वरील कामांची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.
८. रुपये एक कोटी वरील किंमतीच्या कामांना **"Post Qualification Criteria"** ची तरतूद आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा. बां. विभाग, जव्हार,**
**जि. पालघर.**

डीजीआयपीआर/२०२२-२०२३/५२५९


# लाचखोर लिपिकासह शिपाई जेरबंद

**नाशिक :** महापालिकेतील लाचखोर लिपिकासह एका शिपायास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी बेड्या ठोकल्या. हॉकर्स झोनमध्ये बायोमेट्रिक नोंदणी करून रीतसर पावती सुरू करण्याच्या मोबदल्यात एक हजार ८०० रुपयांची लाच स्वीकारताना दोघांना रंगेहाथ पकडण्यात आले. संशयित पश्चिम विभागीय कार्यालयात जाहिरात व परवाना विभागात कार्यरत असून, त्यांनी चहा विक्रेत्याकडे पाच हजाराची मागणी केली होती.

राजू उत्तम वाघ व प्रवण अर्जुन इंगळे अशी अटक केलेल्या सशयितांची नावे असून, वाघ लिपिक, तर इंगळे शिपाई पदावर कार्यरत आहे. वाघ याच्याकडे जाहिरात व परवाना विभागाचा प्रभारी कार्यालय अधीक्षक पदाचा कार्यभार आहे. तक्रारदार यांचा चहा विक्रीचा व्यवसाय असून, टपरीचे नाशिक महानगरपालिका हॉकर्स झोनमध्ये बायोमेट्रिक नोंदणी करून रीतसर पावती सुरू करण्यासाठी त्यांनी पश्चिम विभागीय कार्यालयास कागदपत्र सादर केली आहेत. वेळोवेळी चकरा मारूनही काम होत नसल्याने तक्रारदाराने संशयितांची भेट घेतली असता वाघ याने पाच हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तडजोडीअंती हा व्यवहार एक हजार ८०० रुपयांवर निश्चित केला होता. याबाबत तक्रारदाराने एसीबी पथकाशी संपर्क साधला होता.

# लघुशंका प्रकरण : शंकर मिश्राची कंपनीतून हकालपट्टी

**नवी दिल्ली :** एअर इंडियाच्या विमानात एका वृद्ध महिलेच्या अंगावर लघुशंका करणाऱ्या आपल्या अधिकाऱ्याची 'वेल्स फार्गो' या कंपनीने शुक्रवारी हकालपट्टी केली. शंकर मिश्रा असे त्या ३४ वर्षीय तरुणाचे नाव असून, तो 'वेल्स फार्गो' या अमेरिकी बहुराष्ट्रीय आर्थिक सेवापुरवठादार कंपनीचा भारतातील उपाध्यक्ष होता.

शंकर मिश्रा हा २६ नोव्हेंबर रोजी एअर इंडियाच्या न्यूयॉर्क-दिल्ली विमानातील 'बिझनेस क्लास'मधून प्रवास करत होता. या प्रवासादरम्यान त्याने एका वृद्ध महिलेच्या अंगावर लघुशंका केली होती. या प्रकरणी या आठवड्यात पोलीस तक्रार दाखल झाल्यापासून तो फरार असून, त्याचा तपास सुरू आहे.

दरम्यान, ही घटना उघडकीस आल्यानंतर झालेल्या गदारोळ आणि टीकेच्या पार्श्वभूमीवर तो काम करत असलेल्या कंपनीने त्याला कामावरून कमी केले. आमच्या कर्मचाऱ्यांचे व्यावसायिक आणि वैयक्तिक वर्तन उच्च दर्जाचे असावे, अशी कंपनीची भूमिका असून, या कर्मचाऱ्यावरील आरोप हे मन विचलित करणारे आहे. या व्यक्तीला आता कंपनीतून काढून टाकण्यात आले आहे, असे याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात वेल्स फार्गोने म्हटले आहे.

# डिलिव्हरी बॉयकडून मोबाइल लंपास

**पुणे :** घरपोच विविध वस्तू पोहोचवणाऱ्या कंपनीतील डिलिव्हरी बॉयने ९० हजार रुपये किमतीचा मोबाइल फोन पळवून नेला. कर्वेनगर परिसरात गुरुवारी दुपारी हा प्रकार घडला. या प्रकरणी करण पानिंद्रे याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. चंद्रकांत चव्हाण यांनी या संदर्भात वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डिलिव्हरी डॉट कॉम या कंपनीकडून चव्हाण यांनी घरपोच वस्तू मागविली होती. त्या वेळी चव्हाण याला वस्तू देण्यासाठी पानिंद्रे कर्वेनगर भागात आला. चव्हाण यांचे लक्ष नसल्याची संधी साधून पानिंद्रेने त्याच्या हातातील ९० हजारांचा मोबाइल संच हिसकावून नेला.

# पित्याची दोन मुलांसह आत्महत्या

**आळंद :** शरणनगरमधील किराणा दुकानदार सिद्धारुढ महामलप्पा अक्का (३७) यांनी आपल्या मनीष (१२), श्रेया (१०) या दोन मुलांसहित आळंद बस आगाराजवळील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे खरे कारण समजू शकले नाही. पत्नीचे आजारपण व कर्जबाजारीपणा हे कारण असू शकते, अशी चर्चा ऐकायला मिळाली.

सिद्धारुढ अक्का यांनी आपल्या दोन्ही मुलांना शाळेतून घेऊन घरी आले नव्हते. त्यामुळे सर्वत्र त्यांचा शोध घेतला असता दुसऱ्या दिवशी आळंद बस आगाराजवळील विहीर येथे चप्पल पडल्याचे दिसून आले. आळंद पोलिसांनी अग्निशामक दलाच्या जवानांच्या मदतीने शोधकार्य हाती घेतले असता प्रथम दोन्ही मुलांचे मृतदेह हाती लागले. पण पित्याचा मृतदेह हाती लागत नव्हता. अखेर विहिरीतील सर्व पाण्याचा उपसा केल्यानंतर त्यांचा मृतदेह दिसून आला. मृत सिद्धारुढ अक्का यांची पत्नी संगीता अक्का यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आळंद पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली.


**मानीव अभिहस्तांतरण संबंधी जाहीर नोटीस**
**श्री प्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**पत्ता : मौजे चिकनघर, बी वार्ड, रामबाग, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे**
**नोंदणी क्र. टिएनए/केएलएन/एचएसजी/टिसी/३४४३७/२०२२-२३**

यांनी खालील मिळकतीचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण करुन मिळणेबाबत या कार्यालयाकडे महाराष्ट्र मालकी-हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये अर्ज केलेला आहे. सदर अर्जाची पुढिल सुनावणी **दि. २४/०१/२०२३ रोजी दु. ३.०० वा.** खालील नमूद कार्यालयीन पत्त्यावर निश्चित करण्यात आलेली आहे.

**प्रतिवादी –** १) श्री. जयेश नारायण कोटियन, २) मेसर्स नित्यानंद कन्स्ट्रक्शन कंपनी तर्फे प्रोपा. श्री. एन. एम. कोटियन आणि या मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे वरील सुनावणीचे दिवशी व वेळी हजर राहून सादर करावे.

**मालमत्ता वर्णन : मौजे चिकनघर, ता. कल्याण, जि. ठाणे**

| जुना सर्व्हे नं. | नविन सर्व्हे नं. | हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| - | ९८ | ३ पैकी | - | १८३ चौ.मी. |

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था ठाणे यांचे कार्यालय,**
**पहिला मजला, गावदेवी मंडई, ठाणे (प.), जि. ठाणे. पिन कोड - ४०० ६०२. दूरध्वनी-०२२ २५३३१४८६,**
**दिनांक : ०६/०१/२०२३**
शिक्का
**सही/-**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, ठाणे**



**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार**
**जि. पालघर – ४०१ ६०३**
**Web. : http://mahatenders.gov.in E-mail : jawhar.ee@mahapwd.com**
**ई–निविदा सूचना क्रमांक–३३ सन–२०२२–२३**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जिल्हा पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ई-निविदेमधील सर्व अटी शर्तींची पूर्तता करणाऱ्या **योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून** खालील कामांकरीता **'बी-१'** नमुन्यातील ई-निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली ई-निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मूळ किंमत रु. लक्ष | इसारा रक्कम रुपये | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | चरणगाव वाशाळा रस्ता तयार करणे. (मोऱ्या वॉल बांधकामासह) ता. मोखाडा, जि. पालघर | ९,४८१,३२०.०० | १००,०००.०० | वर्ग ४ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| २. | डोल्हारा ते बोरीचीवाडी रस्ता बांधकाम करणे. कि. मी. ०/६०० ते ३/६०० ता. मोखाडा, जि. पालघर | ८,००७,९९१.०० | ८५,०००.०० | वर्ग ४-अ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| ३. | मडक्याचीमेट ते केळघर रस्ता बांधकाम करणे. कि. मी. ०/५०० ते ३/३०० ता. मोखाडा, जि. पालघर | ८,०४७,६७७.०० | ८५,०००.०० | वर्ग ४-अ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| ४. | बोरशेती ते सावरपाडा मोऱ्यांसह रस्ता तयार करणे. कि. मी. ०/०० ते ३/५०० ता. मोखाडा, जि. पालघर | ८,०७७,९३९.०० | ८५,०००.०० | वर्ग ४-अ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| ५. | बाकरवाडी ते नाशेरा रस्ता बांधकाम करणे. कि. मी. ०/०० ते ३/५०० ता. मोखाडा, जि. पालघर | ८,०७५,२७९.०० | ८५,०००.०० | वर्ग ४-अ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| ६. | रा. मा. ७८ ते धामणशेत पेंडक्याचीवाडी बेहेटवाडी रस्ता तयार करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ३,९७७,४८३.०० | ४३,०००.०० | वर्ग ५ व त्यावरील | रु. ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण-५९०/- | १८० दिवस | |
| ७. | बलद्याचापाडा ते घोडीपाडा रस्त्याचे बांधकाम करणे. कि. मी. २/०० ते ४/०० ता. मोखाडा, जि. पालघर | ३,९८५,२२१.०० | ४३,०००,०० | वर्ग ५ व त्यावरील | रु. ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण-५९०/- | १८० दिवस | |
| ८. | रा. मा. ७८ ते गांधीपुल सातुर्ली रस्ता तयार करणे. कि. मी. ०/०० ते २/०० ता. मोखाडा, जि. पालघर | ९,८९६,३४२.०० | १००,०००.०० | वर्ग ४ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| ९. | रा. मा. ७८ ते गांधीपुल सातुर्ली रस्ता तयार करणे. कि. मी. २/०० ते ४/०० ता. मोखाडा, जि. पालघर | ९,९११,५३६.०० | १००,०००,०० | वर्ग ४ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| १०. | पेंडक्याचीवाडी ते वांग्याची डहाळ नवीन रस्ता तयार करणे. कि. मी. ०/०० ते २/०० ता. मोखाडा, जि. पालघर | ९,४३४,७३२.०० | १००,०००.०० | वर्ग ४ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| ११. | मडक्याचीमेंट ते केळघर रस्ता बांधकाम करणे. कि. मी. ०/५०० ते ३/३०० ता. मोखाडा, जि. पालघर | ८,०४८,०९३.०० | ८५,०००.०० | वर्ग ४-अ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| १२. | पळसुंडा ते स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करणे. कि. मी. ०/०० ते १/८०० ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१११,३५९.०० | ८५,५००.०० | वर्ग ४-अ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| १३. | पिंपळगांव टोकरखांड रस्ता तयार करून साकाव बांधणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ८.१९४,२०६.०० | ८५,०००.०० | वर्ग ४-अ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| १४. | पिंपळगांव ते मडक्याचीमेट घोडीपाडा रस्ता तयार करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ९,६५१,२९४.०० | १००,०००.०० | वर्ग ४ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |
| १५. | धारेचापाडा ते साखरी रस्ता तयार करणे. (मोऱ्या व वॉल) बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ९,१७०,२६५.०० | ९७,०००,०० | वर्ग ४ व त्यावरील | रु. १०००/-+ १८% जीएसटी रु. १८०/- एकूण-११८०/- | ३०० दिवस | |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी** — **दिनांक–०९/०१/२०२३ ते दिनांक–१६/०१/२०२३ पर्यंत**
**ई–निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** — **दिनांक–१७/०१/२०२३ (११.०० वा. शक्य झाल्यास)**

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**टिप :–**
१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या **https://mahatenders.gov.in**
२. निविदाकारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व **DSC** डिजीटल प्रमाणपत्र वितरीत व **Portal** वर **Enrollment** करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. Toll Free No. : १८००३०७०२२३२, E-Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in
३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच असारा/बयाणा रक्कम, ई-निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्तऐवजाच्या मूळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.
४. सादर केलेल्या निविदा कागदपत्रांची प्रत स्वतंत्र पाकिटात **दिनांक–१७/०१/२०२३** रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.
५. शासन निर्णयानुसार निम्नतम निविदाकाराचा (**L-1**) कमी दराबाबतचा (**Performance Security**) चा **FDR/B.G.** लिफाफा क्र. २ (**Financial Bid**) उघडल्याच्या दिनांकापासून ८ (**आठ**) दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नतम निविदाकाराची (**L-1**) इसारा रक्कम (**EMD**) शासन जमा करण्यात येईल व द्वितीय निम्नतम निविदाकारास (**L-2**) ला काम देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
६. इतर अटी व शर्ती ई-निविदेमध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
७. वरील कामांची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **www.mahapwd.com** या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
**सा. बां. विभाग, जव्हार**
**जि. पालघर.**

डीजीआयपीआर/२०२२-२०२३/५२५८


# जीवे मारण्याची धमकी देत गोळीबार

**नाशिक :** कार परत करण्यास गेलेल्या पाच जणांवर मालकाने बंदूक रोखत हवेत गोळीबार करीत जीवे मारण्याची धमकी दिली. आर्थिक व्यवहारातून ही घटना घडल्याचे बोलले जात असून, या प्रकरणी तीन संशयितांविरोधात मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुनील चोरमारे, जग्गू सांगळे व राज जोशी अशी संशयितांची नावे आहेत. या प्रकरणी अविनाश विक्रम टिळेने तक्रार दाखल केली आहे. टिळे यांनी चोरमारे यांची कार वापरण्यासाठी घेतली होती. बुधवारी रात्री टिळे आपला मित्र विनोद गोसावी, यश शिंदे, भूषण देशमुख व युवराज सोनवणे आदींना सोबत घेऊन इंदिरानगर बोगद्यासमोरील साईनाथ चौफुली भागात गेले असता ही घटना घडली. सी. के. मोटार गॅरेजसमोर उभ्या असलेल्या कारमालक चोरमारे व अन्य दोघांनी टिळे यांच्यासह त्यांच्या मित्रांना शिवीगाळ केली. यावेळी चोरमारे याने बंदुकीतून हवेत गोळीबार करून तुम्हाला आता जिवंतच सोडत नाही, अशी धमकी दिली. यावेळी चोरमारे याने टिळे यांच्या अंगावर धावून जात व त्यांच्या दिशेने बंदूक रोखत गोळीबार करण्याचा प्रयत्न केला.

# कारमधून पावणेतीन लाखांचा गुटखा जप्त

**जळगाव :** भुसावळ रोडवरून कारमधून विक्रीसाठी जात असलेल्या मोठ्या प्रमाणावरील अवैध गुटख्यावर सव्वा जळगाव स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. पोलिसांनी २ लाख ७५ हजारांचा गुटखा व कार असा एकूण ४ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जळगाव शहरातील तांबापुरा येथील शेख इम्रान शेख जहुरोद्दीन हा कारमधून जळगाव ते भुसावळ महामार्गाने मोठ्या प्रमाणावर गुटख्याची वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किसन नजनपाटील यांना मिळाली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक गणेश चौभे, सहाय्यक फौजदार युनूस शेख इब्राहिम, रणजित जाधव, श्रीकृष्ण देशमुख, विनोद पाटील, प्रमोद ठाकूर यांच्या पथकाने बुधवारी सायंकाळी सव्वाचारच्या सुमारास जळगाव भुसावळ महामार्गावर टोलनाक्याजवळ सापळा रचला. मिळालेल्या माहितीनुसार संबंधित क्रमाकांची कार आल्यावर तिची तपासणी केली असता, कारमधून २ लाख ७५ हजार २६४ रुपयांचा विमल पान मसाला व तंबाखू मिळून आला. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने अन्न औषधी विभागाच्या माध्यमातून कारवाई करत या प्रकरणी शेख इम्रान शेख जहुरोद्दीन यांच्याविरोधात गुरुवारी नशीराबाद पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,**
**दापोली, जि. रत्नागिरी,**
**पदवीदान समारंभ - २०२३.**
**जाहीर सूचनापत्र**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचा ४१ वा दीक्षांत समारंभ माहे मार्च- २०२३ मध्ये संपन्न होणार आहे. या समारंभात पदवी घेवू इच्छिणाऱ्या स्नातकांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ पूर्वी विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठाकडे फक्त ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. ऑनलाईन अर्ज विद्यापीठ वेबसाईट www.dbskkv.org येथे (link) उपलब्ध आहे. विहित नमुन्यातील अर्ज हा फक्त ऑनलाईन पध्दतीनेच सादर करावयाचा आहे, कोणत्याही परीस्थितीत hard copy विद्यापीठ कार्यालयाकडे पाठविण्यात येवू नये. विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जाचा पदवीदान समारंभाकरिता विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**१. स्नातकांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणेसाठी शुल्क** — **रू. १,५००/-**
**२. स्नातकांना पदवीदान समारंभास हजर राहून पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणेसाठी शुल्क** — **रू. १,०००/-**

पदवी प्रमाणपत्र शुल्क हे ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाचे वेबसाईट वरील 'Online Payment' या टॅबवरुन SBI Collect मार्फत जमा करण्यात यावे. **रोख रक्कम, आय. पी. ओ. धनाकर्ष, स्विकारण्यात येणार नाहीत.**

पदवी प्रमाणपत्र मागणी करणाऱ्या स्नातकांनी पदवीदान समारंभाची तारीख कळविणेकरिता व पदवी प्रमाणपत्र पाठविणेकरिता स्वतःचा संपूर्ण पत्ता ( पोस्टल पिनकोडसहीत), फोन / मोबाईल क्रमांक व ई-मेल अर्जामध्ये नमूद करावा जेणेकरून पदवीदान समारंभ संपन्न झाल्यानंतर पोष्टामार्फत पदवी प्रमाणपत्र मागणी केलेल्या स्नातकांची प्रमाणपत्रे अचूक पत्त्यावर पाठविणे सोईचे होईल.

**सही/-**
**(भ. रा. साळवी )**
**कुलसचिव**

डीजीआयपीआर/२०२२-२०२३/५२७०


# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

## जामखेड तालुक्यातील नान्नज येथील घटना

**जामखेड :** तालुक्यातील नान्नज येथील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या एका २३ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ओमकार दादासाहेब मोहळकर असे या मृत तरुणाचे नाव आहे. ओमकार याने शुक्रवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास राहत्या घरात छताच्या पंख्याला साडीच्या साहाय्याने गळफास घेतला. ही घटना कळताच नान्नजचे सरपंच महेंद्र मोहोळकर यांनी घटनास्थळी धाव घेतली व नातेवाईकांच्या मदतीने त्याला खाली उतरून घेतले. तातडीने बेशुद्ध अवस्थेत असताना उपचारासाठी जामखेड ग्रामीण रुग्णालयात आणले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. हा तरुण बारावी पास झाला होता. पोलीस भरतीची तयारी करत होता.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 116 / 2022–23**

**Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.**

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0901 EM2 Refloated | 3000034530 | Supply, Installation and Commissioning of transformer explosion and fire prevention system for 200 MVA x 2 Generator Transformer at Unit-5, 500 MW Khaperkheda TPS. | 420.00 |

**Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.**

**Sd /-**
**Chief Engineer (O&M)**
**MSPGCL, TPS Khaperkheda**



POONAWALLA HOUSING FINANCE
Apna Ghar, Apni Pehchan

**पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**
(मॅगमा हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून पूर्वज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : ६०२, ६वा मजला, झीरो वन आयटी पार्क, स. क्र. ७९/१, घोरपडी, मुंढवा रोड, पुणे–४११ ०३६

**ई–लिलाव–विक्री सूचना**

**सरफेसी कायद्यांतर्गत प्रतिभूत स्थावर मालमत्तेची विक्री**

समस्त जनता आणि विशेषत्वाने कर्जदार/सहकर्जदार/हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील नमूद मालमत्ता मॅगमा हाऊसिंग फायनान्स लि., जिचे आता इनकॉर्पोरेशन प्रमाणपत्रान्वये पुनावाला हाऊसिंग फायनान्स लि. ('पीएचएफएल') पुन:नामकरण करण्यात आले आहे, यांच्याकडे तारण ठेवण्यात आली आहे, जिचा ताबा पीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने सरफेसी कायद्याच्या अनुच्छेद १३ (४)/१४ अंतर्गत घेतला आहे, ती पीएचएफएलच्या प्रयोज्य व्याज, प्रभार आणि मूल्य इत्यादींसह देय थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद अटींवर ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. सदर मालमत्ता **''जसे आहे जेथे आहे, तेथे जे आहे आणि विनाअवलंब आधारावर''** प्रतिभूती हित (अंमलबजावणी) अधिनियमाच्या नियम ८ आणि ९ अंतर्गत विक्री करण्यात येईल.
विक्रीच्या विस्तृत अटी आणि शर्तींसाठी कृपया पीएचएफएलच्या/प्रतिभूत धनकोच्या संकेतस्थळ www.poonawallahousing.com वर दिलेली लिंक पाहा.

| प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव (ए) | मागणी सूचना दिनांक आणि थकीत रक्कम (बी) | ताब्याचे स्वरूप (सी) | मालमत्तेचे वर्णन (डी) | राखीव किंमत (ई) | इरठे (आरपीच्या १०%) (एफ) | इरठे सादर करण्याची तारीख (जी) | बोली विस्तार (एच) | मालमत्ता निरीक्षणाची तारीख व वेळ (आय) | लिलावाची तारीख आणि वेळ (जे) | ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरण, काही असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **कर्ज क्र. एचएफ/०११६/ एच/१८/१०००२३ रूपेश रमेश जाधव (कर्जदार) सविता प्रकाश गुरव (सहकर्जदार)** | **सूचना दिनांक : १२/०९/२०२२** रू. २२,९३,५३५.८७/– (रुपये बावीस लाख त्र्याणव हजार पाचशे पस्तीस आणि सत्याऐंशी पैसे मात्र) दि. १२/०९/२०२२ रोजी @ १२% प्र. व. दराने वसुली होईपर्यंत व्याजासोबत देय. | प्रत्यक्ष | नोंदणी जिल्हा आणि जिल्हा ठाणे, महाराष्ट्र राज्यामध्ये, उपनोंदणी जिल्हा आणि तालुका भिवंडीमधील ग्रामपंचायत काल्हेरच्या सीमेमधील, गाव काल्हेर, भिवंडीचा सर्व्हे क्र. १०, हिस्सा क्र. २ धारक जमिनीवर बांधलेल्या, ''जय मातादी कॉम्प्लेक्स'' म्हणून ज्ञात कॉम्प्लेक्समधील ''चामुंडाई'' म्हणून ओळखण्यात येणाऱ्या इमारतीमधील 'ए' विंगच्या तिसऱ्या मजल्यावरील सरासरी मोजमापित ५६० चौ. फूट, ५२.०४ चौ. मीटर्स समान बांधीव क्षेत्रफळ (३९२ चौ. फूट चटई क्षेत्रफळ) चा फ्लॅट क्र. ३०१ | रू. २२,६८,०००/– (रुपये बावीस लाख अडुसष्ट हजार मात्र) | रू. २,२६,८००/– (रुपये दोन लाख सव्वीस हजार आठशे मात्र) | १०/०२/२०२३ सायं. ५ पूर्वी | १०,०००/– | ०६/०२/२०२३ (स. ११– दु. ४.००) | १३/०२/२०२३ (स. ११.०० – दु. २.००) | निरंक |

**खरेदी आणि विक्रीवरील तपशील आणि विचारणांसाठी, संपर्क श्री. इक्बाल अलम यांना +९१ ९९५८१९५४५३**

इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना पीएचएफएल शाखेला भेट देण्याचा आणि स्वत: चौकशी करण्याचा आणि बोली सादर करण्यापूर्वी अतिरिक्त प्रभार, भार आणि कोणत्याही तृतीय पक्षाचे हित जाणून घेण्याचा आणि सर्व घटकांचे त्याने स्वत:चे/तिने स्वत:चे/त्यांनी स्वत:चे समाधान करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. मालमत्तेसह संलग्न असलेला मालमत्ता कर, वीज/पाणी देयक आणि असल्यास कोणतीही अन्य देण्यासारखी संविधिक देणी जाणून घ्यावीत आणि यशस्वी बोलीदाराने अदा करावीत.
इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना ई-बोली आणि ई-लिलावावरील प्रशिक्षण प्राप्त करण्यासाठी स्वत:ला खालील नमूद लिलाव सेवा प्रदात्यांच्या वेब पोर्टल https://DisposalHub.Com अनिवार्यरीत्या नोंदणी करणे आणि आगाऊ लॉगइन आयडी व पासवर्ड प्राप्त करणे आवश्यक आहे. **मेसर्स नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड– #२०३, दुसरा मजला, श्री. श्याम पॅलेस, सेक्टर : ४ आणि ५ क्रॉसिंग, रेल्वे रोड, गुरुग्राम–१२२ ००६ (संपर्क क्र. +९१ ९३१०० २९९३३/+९१ ९८१०० २९९२६/+९१ १२४ ४२३३९३३), क्लाइंट सर्व्हिस डिलिव्हरी (सीएसडी) संपर्कासाठी कॉल करा : (मो.) +९१ ९३१०० २९९३३/+९१ ९८१०० २९९२६, (दू.) +९१ १२४ ४ २३३ ९३३. ई-मेल आयडी :** CSD@DisposalHub.Com इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना १०/०२/२०२३ पर्यंत 'पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड' यांच्या नावे, आयसीआयसीआय बँक लि. **खाते क्र. ०००६५१०००४६०**, IFSC Code : ICIC0000006, २०, आर.एन. मुखर्जी रोड, कोलकाता-७०० ००१ येथे कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकेकडून काढलेल्या एनईएफटी/आरटीजीएस/डीडीमार्फत इसारा रक्कम ठेव (इरठे) रक्कम सादर करणे आवश्यक आहे. वेब पोर्टलवर नोंदणीनंतर इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना अपलोड केलेल्या, ई-मेल केलेल्या बोली दस्तावेजाच्या प्रती प्राप्त करणे आणि स्वसाक्षांकित प्रती **प्राधिकृत अधिकारी, श्री. नितेश पवार, पत्ता – शाखा कार्या., युनिट : २०५, दुसरा मजला, लोटस पार्क, रोड क्र. १६, ठाणे पश्चिम, महाराष्ट्र–४०० ६०४, मोबाइल क्र. ९९६७००८०५११, ई–मेल आयडी** nitesh.pawar@poonawallahousing.com यांच्याकडे पाठवा.

**प्राधिकृत अधिकारी**
**पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**
**(मॅगमा हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून पूर्वज्ञात)**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : ०७.०१.२०२३**